# मेट, बीकेसी इन्सटीटयुट ऑफ इंजिनिअरींग , मॅकेनिकलच्या विदयार्थ्यांसाठी वर्कशॉप संपन्न

व्हेकल ओव्हर हाव्लींग या विषयाअंतर्गत मॅकेनिकल इंजिनिअरींग विद्यार्थ्यांसाठी ३ दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्रिग्मा एज्युटेक सर्व्हिसेस , पुणे या संस्थेतील तज्ञांनी व्हेकलची संकल्पना, त्याचे डिझाईन , हयातील मशिन व सर्व पार्टस् याचे संकलन , तंत्रज्ञान आणि एकत्रिकरण या विषयीचे संपुर्ण प्रात्याक्षिक माहिती देऊन तर केलेच व याच बरोबर प्रत्यक्ष मशिन पार्ट समोर ठेऊन सविस्तर समजावून सांगितलेत. यासाठी प्रिग्मा एज्युटेक सर्व्हिसेसचे इव्हेंट मॅनेजर **मानव बत्रा** व टेक्निकल मॅनेजर **परमजीत सिंग** यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्या प्रश्नांची उत्तरेही दिलीत.

सर्व विद्यार्थी थेअरीचा अभ्यास करतात प्रॅक्टीकलही करतात परंतू प्रत्यक्ष एखादया वाहनातील मशिनचा अभ्यास प्रत्यक्षपणे मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.या कार्यशाळेत एकूण १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

या सत्राच्या प्रसंगी उदघाटना प्रसंगी संस्थेच्या प्रमुख संचालिका शेफाली भुजबळ, प्राचार्य डॉ. व्ही. पी. वाणी, विभागप्रमुख डॉ. एस. डी. काळपांडे व इतर शिक्षक उपस्थित होते.



कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित मेट, भुजबळ नॉलेज सिटीच्या प्रमुख संचालिका शेफाली भुजबळ, इन्सटीटयुट ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. वाणी, इतर विभागप्रमुख व विद्यार्थी.



वर्कशॉप प्रसंगी मॉडेलची पडताळनी करतांना विद्यार्थी